इमारतीचे सुरक्षेकरिता सुरक्षा रक्षकाची सेवा
उपलब्ध करुन देणे बाबत या कामाचा कार्यारंभ
आदेश

**जिल्हा परिषद ,अहिल्यानगर**

**सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग**

जिल्हा परिषद आदेश क्र.वशि/बांध/भांडार/१४८/२०२६

दिनांक १४/०७/२०२६
१६/०७/२०२६

**वाचा:**-१) महाराष्ट्र माजि सैनिक ,महामंडळ मर्या.(मेस्को)औरंगाबाद यांचेकडील पत्र
क्र.मेस्को/जि.प.अ.नगर/आर.ओ.औरंगाबाद१०४ दि.०४/०२/२०१९
२) मा.स्थायी समिती सभा दि.०८/०५/२०२६ ठराव क्र.४७८
३) मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अ.नगर यांची मंजुर टिपणी दि.१६/०७/२०२६

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये जिल्हा परिषद अहिल्यानगर , करिता नविन प्रशासकीय इमारत व इतर इमारतीचे सुरक्षे करिता सुरक्षा रक्षकाची सेवा उपलब्ध करुन देणे बाबत मा.स्थायी समिती सभा दि.०८/०५/२०२६ अन्वये ठराव क्र.४७८ नुसार मंजूरी प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या.(मेस्को)औरंगाबाद यांचे सुरक्षारक्षकाच्या सेवा उपलब्ध करुन देणेबाबतच्या , सुरक्षा सेवेची वैशिष्टे आणि कार्यप्रणाली विचारात घेता माहे. माहे एप्रिल २०२६ ते मार्च - २०२७ या एक वर्षाचे कालावधी करिता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून आदेश देण्यात येत आहेत.

१)जिल्हा परिषद नवीन व जुन्या प्रशासकीय इमारतीच्या सुरक्षेसाठी एकूण १६ सुरक्षारक्षक व १ सुपरवायझर पुरविण्यात यावेत.

२)सदरचे कंत्राट हे दि.०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२७ (एकूण १२ महिने) या कालावधीकरीता राहील.

३)सदर सुरक्षेकरीता पुरविण्यात येणार सुरक्षारक्षक हे वय वर्ष २१ पेक्षा कमी व ६५ वर्षापेक्षा जास्त नसावेत.

४)सुरक्षारक्षकांना तीन पाळींमध्ये इमारतींची सुरक्षा करावी लागेल. तसेच एका सुरक्षारक्षकाची प्रति दिन ८ तासांची पाळी असेल याप्रमाणे २४ तासांत ०३ सुरक्षारक्षक पुरवावे लागतील.

५)जिल्हा परिषद इमारतींची सुरक्षा करताना सुरक्षारक्षक हा गैरहजर असेल तर पर्यायी सुरक्षारक्षक तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावा.

६)तसेच सुरक्षारक्षकांचे देयक अदा करताना त्यांचे हजेरीपत्रक देयकासोबत सादर करावे लागेल.

७)तसेच सुरक्षेसंबंधी जर अतिरिक्त सुरक्षारक्षकांची मागणी असल्यास तात्पुरती मागणी पुरवावी लागेल.

८)तसेच सुरक्षारक्षकांना कोणत्याही संघटना निर्माण करता येणार नाही किंवा कोणत्याही संघटनेत सहभागी होता येणार नाही व कोणत्याही संघटनेचे सदस्यत्व स्वीकारता येणार नाही.

९)सुरक्षारक्षकांची अनियमित हजेरी ,वाईट वर्तवणूक ,कामचूकारपणा ,कामात निष्काळजीपणा आढळून आल्यास किंवा असमाधानकारक असल्यास संबंधीत सुरक्षारक्षकांस परत पाठविण्याचा अधिकार जिल्हा परिषदेस राहील.

१०)संबंधीत कराराचा भंग केल्यास किंवा सुरक्षारक्षकांची सेवा समाधानकारक नसल्यास कंत्राट मुदतीच्या आत एक महिन्याची अगाऊ सुचना देऊन संपुष्टात आणण्याचा अधिकार जिल्हा परिषदेस राहील.

११)जर जिल्हा परिषद इमारतींमधील कोणत्याही प्रकारची चोरी अथवा नुकसान झाल्यास संबंधीत पाळीमध्ये नेमणूक असलेल्या सुरक्षारक्षकांना सदर कामी मदत करावी लागेल. तसेच सदरचे नुकसान अथवा चोरी ही सुरक्षारक्षकांच्या चुकी अथवा हजगर्लीपणामुळें झाली असल्याचा निष्कर्ष निघाल्यास मालाची किंमत व मिळणारे सेवाशुल्क विचारात घेऊन नुकसान भरपाईची निश्चित केलेली रक्कम देयकातून वसूल केली जाईल.

१२)कामगार आयुक्त मुंबई व महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ यांचेकडील अटी व शर्तीनुसार सुरक्षारक्षकांचे वेतन अंदाजे रु.३२४६०/- दरमहा (सर्व वेतन व भत्ते मिळून ) व सुपरवायझर चे वेतन हे रु.४५९९०/- दरमहा (सर्व वेतन व भत्ते मिळून )याप्रमाणे राहील.

१३)कराराच्या कालावधीत मेस्को यांनी पुरविलेल्या सुरक्षारक्षक कामावर असताना काही इजा झाल्यास किंवा अपघात घडल्यास कायदेशीर तरतूदींनूसार भरपाई मिळण्याचा हक्कप्राप्त झाल्यास सदरची भरपाई देण्याची संपूर्ण जबाबदारी मेस्कोची राहील.

१४)मेस्कोने पुरविलेले सुरक्षारक्षक कोणत्याही परिस्थितीत जिल्हा परिषदेच्या हे मेस्कोच्या नियंत्रणाखालील असून त्यांना जिल्हापरिषदेचे कर्मचारी म्हणून गणण्यात येणार नाही.

१५)सुरक्षारक्षकांच्या सेवा पुरविताना कायद्याच्या तरतूदनुसार भत्ते वेतन व इतर सवलती देणे ही जबाबदारी ही मेस्कोची राहील. तसेच काही तंटे व फौजदारी स्वरूपाची कार्यवाही उद्‌भवल्यास या सर्वांची जबाबदारी मेस्कोची राहील.

१६)मेस्कामार्फत करारावर नेमण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांचे वर्तन असभ्य असल्यास अथवा संशयास्पद असल्यास अशा सुरक्षारक्षकाविरुध्द अहवाल पर्यवेक्षकाकडे सादर केला जाईल.

१७)सदर आदेश प्राप्त होताच करारानामा करुन देण्याची जबाबदारी आपल्यावर बंधनकारक राहील. सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा सांकेतांक क्रं.202607161200002 असा आहे.

कार्यकारी अभियंता
जि.प. सा.बां.दक्षिण विभाग,
जिल्हा परिषद ,अहिल्यानगर

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
वरिष्ठ व्यवस्थापक कर्मिक व प्रशासन महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या.औरंगाबाद
प्रत- उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सामान्य) जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना माहितीस्तंव
प्रत- मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना माहितीसाठी व कार्यवाहीस्तंव सादर
प्रत- उप अभियंता जि.प.सां.बा.उपविभाग अहिल्यानगर यांना माहितीसाठी व पुढील उचित कार्यवाही साठी
२/- जि.प.प्रशासकीय इमारत सुरक्षाकामी आपल्या स्तरावरून योग्य ते नियोजन करुन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.
प्रत :- निवडनस्ती भांडार शाखा जि.प.सा.बां.दक्षिण विभाग अहिल्यानगर.